योजनांची मूल्यमापन पाहणी, नमुना सर्वेक्षण व सांख्यिकी सल्ला विषयक सेवा ही कामे करण्यासाठी नामिका सूचीत (Empanelment) समाविष्ट करण्यात आलेल्या दोन संस्थांची नावे वगळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक: मुमाअ १०१६/प्र.क्र.७८/का-१४१७

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक: २७ सप्टेंबर, २०१७

वाचा:-

१. शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक मुमाअ १०१६/प्र.क्र. ७८/का-१४१७, दिनांक २२-०७-२०१६.

२. शासन शुद्धीपत्रक नियोजन विभाग, क्र. मुमाअ १०१६/प्र.क्र. ७८/का-१४१७, दिनांक २१-११-२०१६.

प्रस्तावना:

योजनांची मूल्यमापन पाहणी, नमुना सर्वेक्षण व सांख्यिकी सल्ला विषयक सेवा ही कामे करण्यासाठी नामांकित बाह्यस्थ संस्थांची नामिकासूची (Empanelment) दिनांक २२-७-२०१६ च्या शासन निर्णयानुसार तयार करण्यात आली आहे. सदर नामिका सूचीतील बाह्यस्थ संस्थांची गट-१ वाणिज्यिक (Commercial) व गट-२ शासकीय / शासन अनुदानीत अशा दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. सदर नामिकासूचीत समाविष्ट असलेल्या परंतु करार (Contract Agreement) व बँक हमी (Bank Guarantee) या कागदपत्रांची पूर्तता न केलेल्या संस्थांना नामिका सूचीतून वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

नियोजन विभाग शासन निर्णय, क्र. मुमाअ-१०१६/ प्र.क्र.७८/का-१४१७, दिनांक २२-७-२०१६ अन्वये तयार करण्यात आलेल्या नामिका सूचीत समावेश असलेल्या गट-१, प्रकार-१ (Category A1) मधील अ. क्र. ६. **National Council of Applied Economic Research (NCAER), New Delhi** व गट-१, प्रकार-२ (Category B1) मधील अ. क्र. ३. **JPs Associates Pvt. Ltd, Delhi** या दोन्ही संस्थांनी करार (Contract Agreement) व बँक हमी (Bank Guarantee) या कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे सदर संस्थांना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून नामिका सूचीतून वगळण्यात येत आहे. सदर दोन्ही संस्थांनी, योजनांची मूल्यमापन पाहणी, नमुना सर्वेक्षण व सांख्यिकी सल्ला विषयक सेवा ही कामे करण्यासाठी उपरोक्त नमुद दिनांक २२-७-२०१६ रोजीच्या शासन निर्णयाचा उपयोग करू नये.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२७१५३१४८४४१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2017.09.27 15:20:33 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (सदर शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये, मंडळे, महामंडळे, अंगिकृत उपक्रम यांच्या निदर्शनास आणावा).
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा / विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
७) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
८) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
९) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११) अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२) प्रादेशिक सहसंचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
१३) उपायुक्त (नियोजन) (सर्व), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
१४) जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व), जिल्हाधिकारी कार्यालय,
१५) जिल्हा सांख्यिकी अधिकारी (सर्व), जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
१६) नियोजन विभाग, सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई-३२.
१७) संबंधीत संस्था (अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत)
१८) निवड नस्ती (का. १४१७)